पनवेल उपजिल्हा रुग्णालया करीता काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास व त्या करीता येणा-या खर्चास प्रशाकीय मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः प्रशामा २०१९/प्र.क्र. २०३/आरोग्य ३अ**
१० वा मजला,जी.टी. रुग्णालय आवार,
मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : ५ जुलै, २०१९

**वाचा -**

१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः पदनि २०१७/प्र.क्र.२३१/आरोग्य ३, दि. १६ फेब्रुवारी, २०१८
२) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः पदनि २०१८/प्र.क्र.४० (भाग-२)/आरोग्य ३, दि. २३ मे, २०१८
३) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः पदनि २०१८/प्र.क्र.३२८/आरोग्य ३, दि. २२ फेब्रुवारी, २०१९
४) सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, यांचे पत्र क्रमांक :- संआसे/राज्यस्तर/कक्ष-३/टे-९/उजिरुपनवेल/कुशल-अकु/पद/भरणे/९०७३-७४/१९ दिनांक १९/६/२०१४९

**प्रस्तावना -**

उपजिल्हा रुग्णालय, पनवेल व ट्रामा केअर युनिट पनवेल च्या इमारतीचे काम पुर्णत्वास आले असून सदर रुग्णालयामध्ये उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर युनिटच्या आकृतीबंधानुसार संदर्भ क्र. १ व २ च्या शासन निर्णयानुसार एकुण ८५ पदांची पदनिर्मिती करण्यात आलेली आहे. सदर पदनिर्मिती मध्ये नियमित पदे तसेच, काल्पनिक कुशल व अकुशल पदांचा समावेश करण्यात आलेला आहे. काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळा करीता संदर्भ क.३ च्या शासन निर्णयान्वये शैक्षणिक अर्हता व अनुभव आणि मासिक मानधन निश्चित करण्यात आले आहे

सदर रुग्णालय लवकरात लवकर कार्यान्वित करावयाचे असल्याने रुग्णालयास मंजूर असलेली सर्व मनुष्यबळ भरणे आवश्यक आहे. सदर रुग्णालय कार्यान्वित करण्यासाठी काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर खाजगी पुरवठादाराकडून उपलब्ध करुन घेण्यास व त्या वरील खर्चास प्रशासकीय मंजूरी बाबतचा संचालक आरोग्य सेवा, संचालनालय यांचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता याबाबत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

## शासन निर्णय-

पनवेल उपजिल्हा रुग्णालय व ट्रामा केअर युनिट कार्यान्वित करण्याकरीता खालील तक्त्यात नमूद करण्यात आलेली काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ अशी एकूण ५७ मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर खाजगी पुरवठादारांकडून उपलब्ध करून घेण्यास व त्याकरीता येणा-या रूपये १,२०,२६,९००/- (अक्षरी रुपये एक कोटी वीस लक्ष सव्वीस हजार नऊशे फक्त) इतक्या खर्चास खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | मनुष्यबळाचा प्रकार | मंजूर मनुष्यबळ | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मासिक एकत्रित मानधन | प्रस्तावित एकत्रित मानधन (११ महीन्यासाठी) |
|---|---|---|---|---|---|
| | **काल्पनिक कुशल मनुष्यबळ** | | | | |
| १ | अधिपरिचारीका | २० | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | ५५०००० |
| २ | भौतिककोपचार तज्ञ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २८००० | ३०८००० |
| ३ | आहार तज्ञ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २८००० | ३०८००० |
| ४ | रक्तपेढी तंत्रज्ञ | २ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | ५५०००० |
| ५ | क्ष-किरण तंत्रज्ञ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | २७५००० |
| ६ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | २७५००० |
| ७ | ई.सी.जी तंत्रज्ञ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | २७५००० |
| ८ | औषधनिर्माण अधिकारी | २ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १६६०० | ३६५२०० |
| ९ | प्रयोगशाळा सहाय्यक | २ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १५१०० | ३३२२०० |
| १० | भांडार तथा वस्त्रपाल | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १४९०० | १६३९०० |
| ११ | बाहयरुग्ण सेवक | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२१०० | १३३१०० |
| १२ | अपघात विभाग सेवक | ३ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२१०० | ३९९३०० |
| १३ | रक्तपेढी परिचर | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२८०० | १४०८०० |
| १४ | शस्त्रक्रियागृह परिचर | २ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १३३०० | २९२६०० |
| १५ | व्रणोपचारक | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १३३०० | १४६३०० |
| १६ | बाहयरुग्ण लिपिक | २ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १३३०० | २९२६०० |
| १७ | कक्ष सेवक | ६ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२१०० | ७९८६०० |
| १८ | शिपाई वर्ग-४ | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२१०० | १३३१०० |
| १९ | अधिपरिचारीका (ट्रामा केअर युनिटसाठी) | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | २५००० | २७५००० |
| २० | वाहनचालक (ट्रामा केअर युनिटसाठी) | १ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १४९०० | १६३९०० |
| २१ | कक्षसेवक (ट्रामा केअर युनिटसाठी) | ३ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | १२१०० | ३९९३०० |
| | एकूण | ५४ | सेवा प्रवेश नियमाप्रमाणे | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **काल्पनिक अकुशल मनुष्यबळ उपजिल्हा व ट्रामा केअर युनिटसाठी** | | | | |
| २२ | सफाईगार | ३ | बाहययंत्रणेद्वारे | (आऊटसोर्सीग) | ५००००० |
| | एकूण | ५७ | | | १२०२६९०० |

अटी व शर्ती :-

१. उपरोक्त मनुष्यबळाची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल.

२. उपरोक्त विवरणपत्रात नमूद अधिकारी/कर्मचारी यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

३. काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ खाजगी पुरवठादाराकडून उपलब्ध करुन घेण्याबाबत निविद प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर केंद्रीय खरेदी समितीची मान्यता घेऊन निवड झालेल्या कंत्राटदारास कार्यारंभ आदेश द्यावेत.

४. प्रशासकीय मान्यता देताना प्रक्रियेअंती निश्चित करण्यात आलेला दर हा बाजार भावापेक्षा कमी असल्याबाबत आणि संबंधीत सेवा पुरवठादाराने या बाबींचा इतर ठिकाणी ज्या दराने पुरवठा केला आहे, त्या दरापेक्षा जास्त नसल्याबाबत खातरजमा करण्यात यावी.

५. संपूर्ण प्रक्रिया राबवितांना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे (CVC Guidelines) तंतोतंत पालन करण्यात यावे.

६. सदर कंत्राटी सेवा पुरवण्याबाबतची निविदा प्रक्रिया पुरवठादाराकडून नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या मानधनावरील केवळ सेवा शुल्क वर आधारीत असावी जेणेकरुन कर्मचा-यांना निश्चित केलेले मानधन मिळण्यास अडचण येणार नाही.

७. कर्मचा-यांना देय असलेले मानधन पुर्णपणे अदा झाल्याची खात्री केल्याशिवाय पुढील महिन्याचे देयक अदा करण्यात येऊ नये.

वरीलप्रमाणे काल्पनिक कुशल व अकुशल मनुष्यबळ अशी एकूण ५७ मनुष्यबळ कंत्राटी तत्वावर खाजगी पुरवठादारांकडून उपलब्ध करुन घेण्याकरीता येणारा खर्च खालील लेखाशिर्षातून सन-२०१९-२०२० या वितिय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक आर-१ मुख्य लेखाशिर्ष २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६-सार्वजनिक आरोग्य, ००१-संचालन व प्रशासन (०१) (०९) महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रा. रु./कु.रु. चे उपजिल्हा रुग्ण्यामध्ये श्रेणीवर्धन (२२१० ४६२४).

वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम भाग-२, दि. १७/४/२०१५ सोबतच्या परिशिष्टातील वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-१, उपविभाग-४ मधील

अनुक्रमांक ११ अन्वये प्रशाकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारानुसार तसेच त्यात नमूद अटीची पुर्तता करुन सदरचा मंजूरी आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१३१७३२०५८५१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ed4c738df60ac2ac776b9e2481f77ad50aba9dc28bb31a482e03c7ee7b6f64d8, serialNumber=7caa550613a8c4cb7c593368faa24e20d6f8985f510118e6fc1af8b04a443ee8, cn=Rajendra Shamraoji Kaurte
Date: 2019.07.05 18:18:42 +05'30'

**(रा.शा.कौरते)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री सचिवालय मंत्रालय, मुंबई.
२. मा. विरोधी पक्ष नेते महाराष्ट्र विधान सभा/विधान परिषद विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
३. मा. मंत्री, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई.
४. महालेखापाल (लेखा परीक्षा)/(लेखा अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
५. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
६. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय , मुंबई.
७. उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड.
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, रायगड.
१०. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, पनवेल.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड, अलिबाग
१२. जिल्हा उपकोषागार अधिकारी, पनवेल.
१३. वित्त विभाग (कोषागारे/प्रशासन ५), मंत्रालय, मुंबई.
१४. अवर सचिव (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवड नस्ती (कार्यासन आरोग्य-३अ)